# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर



## २२ वा दीक्षांत समारंभ

## जाहीर निवेदन

पदवी/पदविका प्रदान करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाचा बाविसावा (२२वा) वार्षिक दीक्षांत समारंभ साधारणपणे **जुलै-२०२६ मध्ये** संपन्न होणार आहे. या समारंभात जे विद्यार्थी पदवी/पदवीका प्रमाणपत्रे घेऊ इच्छिता, अशा विद्यार्थ्यांकडून विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या शुल्कासह ऑनलाईन प्रणालीद्वारे स्वीकारले जाणार आहेत.

**ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचा तपशिल**

दिनांक- **०१/०७/२०२६** पासून **१३/०७/२०२६** पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची मुदत असून त्याचे शुल्क खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | शुल्क | शुल्क स्वीकारायची पद्धत |
|---|---|---|---|
| १ | माहे मार्च/एप्रिल/मे २०२१ ते मार्च/एप्रिल/मे २०२६ या दरम्यान उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता | रु. ६००/- | फक्त Online Payment द्वारे |
| २ | माहे मार्च/एप्रिल/मे २००५ ते ऑक्टोबर/नोव्हेंबर/डिसेंबर २०२० या दरम्यान उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता | रु. ९००/- | |

**टीप- ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्राचे शुल्क अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राचा परीक्षा फॉर्म भरतेवेळी भरलेले आहे. त्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची आवश्यकता नाही, उर्वरीत सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.**

विद्यार्थ्यांकरिता नमूद केलेल्या मुदतीच्या दिनांकानंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठीचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्यासंबंधी संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या http://sus.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दीक्षांत समारंभाची तारीख व वेळ नंतर जाहीर केली जाईल व याची माहिती विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

*** विद्यार्थ्यांकरिता महत्वाच्या सूचना -**

१) विद्यार्थ्यांनी आपले अलीकडील छायाचित्र (फोटो), अंतिम वर्षाची गुणपत्रिका, प्रोव्हिजनल सर्टिफिकेट Scan करुन Upload करावे अन्यथा या पूर्वीचे उपलब्ध असलेले छायाचित्र पदवी प्रमाणपत्रावर छापले जाईल.

२) उपरोक्त प्रमाणे Online अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र त्यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर जलद टपालाद्वारे दीक्षांत समारंभानंतर पाठविण्यात येईल. त्याकरीता आवश्यक असलेला अचूक पत्ता पिनकोड सहित नोंद करणे आवश्यक आहे.

३) दीक्षांत समारंभामध्ये फक्त पीएच.डी. व सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांनाच पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

४) पदवी अर्ज भरताना काही अडचणी आल्यास विद्यार्थी सहायता केंद्रातील ९७०२३०१३०२ या भ्रमणध्वनीवर आणि su.sfc@studentscenter.in या ई-मेल आयडी वर संपर्क साधावा.

५) ऑनलाईन भरलेल्या अर्जाची अथवा कागदपत्रांची छायांकित प्रत (Hard Copy) विद्यापीठामध्ये जमा करण्याची आवश्यकता नाही यांची नोंद घ्यावी.

६) व्दि-पदवी (Re-degree) पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मिळणेबाबतची तरतूद नसल्याने सदर विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज करु नये.

**जा.क्र.पुअहोसोविसो/पवमुमं/२०२६/१०१०**

**दिनांक-२९/०६/२०२६**

**स्वाक्षरीत**

**(डॉ. श्रीकांत ग. अंधारे)**

**संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ**